सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 419 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 03 / 11 / 2025

---

# 1)खुन :-

**भाग्यनगर :-** दिनांक 02.11.2025 रोजी 01.00 वा.ते 02.17 वा. चे दरम्यान, **साई किराणा दुकान रोडवर पावडेवाडी नांदेड येथे**, यातील मयत नामे रितेश बाबु पावडे, वय 21 वर्षे रा. पावडेवाडी, नांदेड यास यातील आरोपी नामे 1.दिगांबर बापूराव पावडे, वय 22 वर्षे, 2.केशव बापूराव पावडे, वय 27 वर्षे, व इतर अनोळखी यांनी संगनमत करून जुन्या भांडणाचे कारणावरून मारहाण करून गंभीर दुखापत करून खुन केला. वगैरे **फिर्यादी माणिक संभाजी पावडे, वय 48 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पावडेवाडी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 586/2025 कलम 103(1) 3,(5)भारतीय न्याय संहिता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री तांबे, मो.क्रं. 9850188100** हे करीत आहेत. सदर गुन्हातील एक आरोपी ताब्यात असुन अधिक तपास सुरू आहे

# 2)जबरी चोरी :-

**विमानतळ :-** दिनांक 02.11.2025 रोजी 01.00 वा.चे सुमारास, **शंकरराव चव्हान चौक कामठा रोडवर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे पत्नी मोटार सायकलवर वर जात असताना तीन अनोळखी इसम मोटार सायकलवर येवुन फिर्यादीचे पत्नीचे खांदयास अडकवलेली पर्स त्यामधील नगदी, दोन मोबाईल फोन,सोन्याचे दागिने असा एकुण किंमत 1,64,000/- रू चा मुद्देमाल जबरीने चोरून नेले.वगैरे **फिर्यादी दिपक व्यंकटी शिरफुले, वय 35 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. कामारी ता. हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 446/2025 कलम 304(2), 3(5)बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/साखरे मो. नं. 9096651263** हे करीत आहेत.

# 3)फसवणुक :-

**शिवाजीनगर :-** दिनांक 06.10.2024 रोजी ते दिनांक 07.10.2024 दरम्यान, **एस.बी.आय.बँक नवा मोंढा नांदेड येथे,** आरोपी नामे दत्तात्रय गणपतराव कोळपे, वय 68 वर्षे, रा. तरोडा खु.नांदेड याने यातील फिर्यादीचे मयत पती नामे सचिन दत्तात्रय कोळपे, यांचे खात्यावरील 18,00,000/-रू रक्कम मयताचे वारस पत्नी नामे कृष्णा सचिन कोळपे, व मुलगी नामे जान्हवी यांना कोणत्याही प्रकारची कल्पना न देता बँक खात्यातुन काढून घेवून फिर्यादीचा विश्वासघात करून फसवणुक केली. मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे आदेशान्वये कलम 175(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वगैरे **फिर्यादी कृष्णा सचिन कोळपे उर्फ कृष्णा देविदास कदम, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. तरोडा बु.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 402/2025 कलम 318(4)340(2)बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कदम, मो.नं. 8308517710** हे करीत आहेत.

# 4)सार्वजनिक उपद्रव पसरविणे :-

**उमरी :-** दिनांक 01.11.2025 रोजी 14.00 वा.चे सुमारास, **मौ. कोडगाव ता.उमरी येथे,** आरोपी नामे श्रीराम आनंदराव येताळे,रा.कोडगाव ता.उमरी याने आपल्या मोबाईल फोन मधील व्हॉट्सअपवर दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल असे स्टेटस अपलोड केले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/69 अरविंद विठ्ठल हैबतकर, नेम पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 336/2025 कलम 353(1),353(2) बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शिंदे, मो.क्रं. 9867565715** हे करीत आहेत

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**भाग्यनगर :–** **मा.श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणी शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते त्या अंतर्गत** दिनांक 01.11.2025 रोजी 22.45 वा. चे सुमारास, **सम्राट बारकडे जाणारे रोडवर नांदेड येथे,** आरोपी नामे उत्कर्ष साहेबराव किर्तने, वय 22 वर्षे रा. सुर्योदयनगर, नांदेड हा विना परवाना बेकादेशीररीत्या एक लोखंडी खंजर आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1098 गजानन दिगांबर किडे, ने. भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 585/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2479 सोनवने, मो.नं. 9309770040** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**मरखेल :–** दिनांक 02.11.2025 रोजी 01.00 वा. चे सुमारास, **मौ.मानुर सार्वजनिक रोडवर ता.देगलुर येथे,** यातील आरोपी नामे 1.बाबुराव मारोतराव पांढरे, 2.राजुप्पा संगप्पा गुंडरे, वय 40 वर्षे, 3.विनोद अबाजी पांढरे वय 37 सर्व रा. मानुर ता.देगलुर हे विना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2800/–रू चे मुद्देमाल व  जुगाराचे साहित्यासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2864 नारायण पांडुरंग येगले, ने.पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 231/2025 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2414 पाटील, मो.क्रं. 8261006044** हे करीत आहेत.

## 07)गळफास घेवून शेतकरी आत्महत्या :–

**रामतीर्थ :–** दिनांक 01.11.2025 रोजी 20.00 वा.ते दिनांक 02.11.2025 रोजी 08.45 वा चे दरम्यान, **मौ. बेळकोनी बु. राहते घरी ता. बिलोली येथे,** यातील मयत नामे शिवदर्शन प्रभु शंकुरवाड, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. बेळकोनी बु. ता. बिलोली, यांनी अतिवृष्टी होवून पिकाचे नुकसान झाल्याने व बँकेचे कर्ज कसे फेडायचे या चिंतेत गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार राघवेंद्र प्रभु शंकुरवाड, वय 42 वर्षे, रा. बेळकोनी बु ता. बिलोली,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे रामतीर्थ** आ. मृ. **24**/2025 कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/1882 सुर्यवंशी, मो.नं. 7507747000** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड